महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.कृशिप्र.१३२१/प्र.क्र.०३/केंप्रप्र /जावैप्र/मुदतवाढ/२०२१/०५४, दि.०७/०१/२०२२

## महत्वाची सूचना

### शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अंतर्गत प्रवेश प्रक्रियेसंदर्भात कृषी व संलग्न अभ्यासक्रमांच्या उमेदवार , महाविद्यालये / संस्था यांच्याकरिता

संदर्भ:- आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेकडील महत्वाची सूचना क्र.कृशिप्र. -१३२१/प्र.क्र. /केंप्रप्र /जावैप्र/मुदतवाढ/२०२१/२०७१, दि.०७/१२/२०२१

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील पदवी अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

२. ज्या उमेदवारांना पहिल्या, दुस-या, तिस-या ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेले आहे आणि त्यांनी EWS/NCL/CVC/TVC ऐवजी या कागदपत्रांच्या पावत्या जोडलेल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांचे रद्दबातल ठरविण्यात आलेले प्रवेश दि.६/१/२०२२ पर्यंत तात्पुरते ग्राह्य धरण्यात आलेले आहेत. तसेच ज्या उमेदवारांनी प्रवेश अर्जासोबत EWS/NCL/CVC/TVC प्रमाणपत्राऐवजी पावत्या अपलोड केलेल्या आहेत, अशा अप्रवेशित उमेदवारांना चौथ्या ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीकरिता राखीव प्रवर्गात ग्राह्य धरण्यात आलेले आहे.

३. चौथी ऑनलाईन प्रवेश वाटप यादी तांत्रिक कारणास्तव एक दिवस उशिराने म्हणजेच दि. ३/१/२०२२ ऐवजी दि.४/१/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असल्याने EWS/NCL/CVC/TVC प्रमाणपत्राऐवजी पावत्या अपलोड केलेल्या विद्यार्थ्यांना EWS/NCL/CVC/TVC प्रमाणपत्र त्यांच्या लॉगइनद्वारे किंवा संबंधित महाविद्यालयाकडे दि. ६/१/२०२२ ऐवजी दि.७/१/२०२२ पर्यंत सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

(रविंद्र जगताप)
आयुक्त,
राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष